# ‘बँकेचे संचालकपद ८ वर्षांसाठीच’

## सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेचे बंधन



बदलत्या काळानुसार बँकिंगमधील बदल समजून घेऊन कामकाजात सुधारणा करण्याची उमेद असलेल्यांची निवड संचालकपदी होणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकारी बँकांच्या संचालकपदी जास्तीत जास्त दोन वेळा आणि आठ वर्षांपेक्षा जास्त काळ राहता येणार नसल्याची तरतूद केली आहे. सहकारी बँकिंग क्षेत्र देशाच्या मुख्य बँकिंग प्रवाहाशी जोडले जावे, यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

– सतीश मराठे, संचालक, रिझर्व्ह बँक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘तरुणांना सहकार क्षेत्रात कामाची संधी मिळावी यासाठी सहकारी बँकांच्या संचालकपदी जास्तीत जास्त दोन वेळा किंवा आठ वर्षांपेक्षा जास्त काळ राहता येणार नाही, अशी तरतूद रिझर्व्ह बँकेने केली आहे,’ असे रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले. कामकाजातील गुणवत्तेअभावी देशातील नागरी सहकारी बँकांपैकी ५० टक्के बँकांवर रिझर्व्ह बँकेने बंधने आणल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विश्वेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात मराठे बोलत होते. राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर, रिझर्व्ह बँकेचे माजी मुख्य सरव्यवस्थापक रत्नाकर देव, विश्वेश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष अनिल गाडवे, संपदा सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक मठकरी, कॉसमॉस सहकारी बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, गजानन सहकारी बँकेचे उपाध्यक्ष मधुकर बाबर, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते, जिजामाता सहकारी बँकेच्या अध्यक्ष स्मिता यादव, भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या अध्यक्ष स्मिता देशपांडे, विश्वेश्वर बँकेचे माजी संचालक दिलीप मेहता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम आपटे आदी या वेळी उपस्थित होते.

‘देशातील नागरी सहकारी बँकांपैकी ५० टक्के बँकांवर रिझर्व्ह बँकेने बंधने घातली आहेत. कमी भांडवल किंवा अन्य आर्थिक निकषांमुळे बंधने न घालता कामकाजाच्या गुणवत्तेशी तडजोड होऊ नये, यासाठी आहेत,’ असेही मराठे यांनी स्पष्ट केले. ‘मालकी आणि व्यवस्थापन या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. कॉर्पोरेट जगताने अवलंब केलेल्या तत्त्वांचा स्वीकार सहकारी बँकांनीही करायला हवा,’ असेही मराठे म्हणाले.

‘सहकारी बँकांनी संचालक मंडळावर तरुणांची वर्णी लावण्यासाठी प्रयत्न करावा, अशी केंद्र सरकारचीही भूमिका आहे,’ असे अनास्कर म्हणाले.

**NEWS PAPER NAME:- MAHARASHTRA TIMES**
**NEWS PUBLISHED DATE:- 05-07-2022**
**PAGE NO:- 02**